| | | |
|---|---|---|
| | दाखल तारीख | २३/१२/२०२२ |
| | नोंदणी तारीख | २३/१२/२०२२ |
| | निर्णय तारीख | २८/१२/२०२३. |
| | कालावधी | ०१ व ०० म ०५ दि. |
| | निशाणी क्र. | ३१ |
| | सी.एन.आर. न. | MHSN010046272022 |

**भाग अ**

| |
|---|
| **सांगली येथील सत्र न्यायालयात** <br> - |
| पिठासीन अधिकारी : मीना म. पाटील <br> अतिरिक्त सत्र न्यायाधीश सांगली |
| न्यायनिर्णय तारीख – २८/१२/२०२३ |
| **सत्र खटला क्रमांक ३६४/२०२२** |
| **कडेगांव पोलीस ठाणे गु. र. नं. १८८/२०२२** |

| | | |
|---|---|---|
| **फिर्यादी** | : – | महाराष्ट्र सरकार <br> पोलीस निरीक्षक पोलीस ठाणे कडेगांव |
| सरकार पक्षातर्फे विधीज्ञ | :– | श्रीमती व्ही. के. मुरचिटे |

| | | |
|---|---|---|
| | | अति. सरकारी अभियोक्ता |
| **आरोपी** | १ | **पंकज तानाजी पाटील**,<br>वय- ३० वर्षे, व्यवसाय-<br>रा-खंबाळे औंध, ता. कडेगांव,<br>जि.सांगली. |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | | विधीज्ञ श्री. एम.एम.मठपती |

**भाग ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडला तारीख | ११/०८/२०२२ |
| प्रथम वर्दी दाखल तारीख | ०७/०९/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०५/११/२०२२ |
| दोषारोपत्र ठेवल्याची तारीख | ११/१२/२०२३ |
| पुरावा सुरु केल्याची तारीख | १८/१२/२०२३ |
| न्यायनिर्णयासाठी निश्चित केलेली तारीख | ...... |
| न्यायनिर्णय जाहीर केलेली तारीख | २८/१२/२०२३ |
| शिक्षा दिल्याची तारीख किंवा काय ? | लागू नाही |

**आरोपींचा तपशील**

| क्र. | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सुटलेली तारीख | गुन्हयातील कलमे | आरोपीस निर्दोष किंवा शिक्षा झाली | झालेली शिक्षा | फौ. प्र. सं कलम ४२८आरोपीचा कारागृहातील |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | काय | | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पंकज तानाजी पाटील | १४/०९/२०२२ | १४/१० /२०२२ | भारतीय दंड विधान कलम ३७६, ५०६ | निर्दोष मुक्तता | लागू नाही | -- |

**भाग क**

(क्रिमीनल मॅन्यूअल चॅप्टर ६ परिच्छेद ४४ (**iii**)) प्रमाणे सरकार पक्ष / बचाव पक्ष / न्यायालयाचे वतीने घेण्यात आलेली साक्षीदारांची यादी

अ – **सरकार पक्ष**

| साक्षीदार क्रमांक | नांव | निशाणी क्र. | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| सा.क्र. १ | पिडीता | २१ | फिर्यादी |
| सा.क्र. २ | अजित उत्तम भोसले | २६ | साक्षीदार |
| सा.क्र. ३ | पोलीस नाईक श्रीमती शिंदे | २७ | ठाणे अंमलदार |
| सा.क्र. ४ | पोलीस उपनिरीक्षक श्रीमती पवार | २८ | तपासी अंमलदार |

ब – **बचाव पक्षाचे वतीने तपासलेले साक्षीदार**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| ... | .... | .... |

क – न्यायालचयाच्या वतीने तपासण्यात आलेले साक्षीदार

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| –– | –– | –– |

सरकार पक्ष / बचाव पक्ष / न्यायायलयामार्फत निशाणी देण्यात आलेल्या कागदपत्राची यादी

अ सरकार पक्ष

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचे वर्णन |
|---|---|---|
| १ | पी –१/स.सा.क्र. ३ | फिर्याद |
| २ | पी–२/स.सा.क्र.४ | साक्षीदार क्र. २ यांचे जबाबातील अधोरेखीत केलेला भाग. |
| ३ | २० | फिर्यादी/पिडीता चा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६४ प्रमाणे नोंदविलेला जबाब. |
| ४ | २२ | घटनास्थळ पंचनामा |
| ५ | २३ | फिर्यादी/पिडीतेचा न्यायवैदयक प्रयोगशाळेचा अहवाल |
| ६ | २४ | आरोपीचा न्यायवैदयक प्रयोगशाळेचा अहवाल. |
| ७ | २५ | कार जप्ती पंचनामा |

ब . बचाव पक्षातर्फे शाबीत केलेले कागद

| अ.क्र | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| ... | ..... | .... |

| | | |
|---|---|---|
| | | |

क न्यायालयाने दिलेल्या निशाणी

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| -- | -- | --- |

ड :- मुद्देमाल साहित्य

| अ.क्र. | वस्तू क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | .... | ...... |

## न्यायनिर्णय

(दिनांक २८/१२/२०२३)

१. प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३७६ आणि ५०६ या दंडनीय अपराधासाठी चालविण्यात आला.

२. सरकार पक्षाच्या कथनानुसार फिर्यादी/पिडीता ही विवाहित असून दोन मुलांची आई आहे. तसेच ती तिच्या घरासमोर किराणा मालाचे दुकान चालवते. आरोपी हा तिचा सख्खा चुलत दीर आहे. सन २०२२ पासून तो तिच्यासोबत मोबाईलवर स्नॅप चॅट वरती मेसेजेसची देवाण-घेवाण करीत होता. त्यानंतर जुलै २०२२ पासून आरोपी हा तिला मैत्री करण्यासाठी विनंती करून जर तिने मैत्री करण्यास नकार दिला तर त्यांच्यातील संभाषण तिच्या

पतीला दाखवण्याची धमकी देऊ लागला. त्यामुळे तिने त्याच्याशी मैत्री केली. वरील प्रमाणे धमकी देऊन तो तिच्या कडे शारीरिक संबंधाची मागणी करू लागला. दिनांक ११/०८/२०२२ रोजी तिची तब्येत बरी नसल्याने ती डॉक्टरांकडे जात असताना आरोपी तिच्या मागे आला आणि वरील प्रमाणे धमकी देऊन तिला दुपारी चारच्या सुमारास चार चाकी गाडीतून कडेगांवकर लॉज, कडेगाव येथे तिच्या इच्छेविरुद्ध नेऊन तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले. त्यानंतर देखील तो तिच्याकडे शारीरिक संबंधाची मागणी करू लागला. तिने त्यास नकार दिला असता तो तिला व तिच्या पतीला जीवे मारण्याची धमकी देऊ लागला. त्यामुळे तिने सदर प्रकार तिच्या पतीस सांगितला आणि दिनांक ०७/०९/२०२२ रोजी आरोपीविरुद्ध पोलीस ठाणे कडेगाव येथे फिर्याद दाखल केली. सदर फिर्यादच्या आधारे भारतीय दंड विधान कलम ३७६ (२) (फ) आणि ५०६ प्रमाणे गुन्हा क्रमांक १८८/२०२२ ची नोंद करण्यात आली

३. पोलीस उपनिरीक्षक श्रीमती पवार यांनी सदर गुन्हयाचा तपास

केला. तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला, फिर्यादीची वैद्यकीय तपासणी करून घेतली, तिचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १६४ प्रमाणे जबाब नोंदवून घेतला, साक्षीदारांचे जबाब नोंदवले. त्यानंतर आरोपीस दिनांक १४/०९/२०२२ रोजी अटक करून त्याची वैद्यकीय तपासणी करून घेतली. आरोपीने गुन्हयात वापरलेली अल्टो कार पंचनामेनुसार जप्त केली आणि उपलब्ध पुराव्याच्या आधारे आरोपी विरुद्ध प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कडेगाव यांच्या न्यायालयात वरील कलमांनुसार दोषारोप पत्र दाखल केले.

४. भारतीय दंड विधान कलम ३७६ हा गुन्हा सत्र न्यायालयाच्या अधिकार क्षेत्रात येत असल्यामुळे विद्वान न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कडेगांव यांनी दिनांक १३/१२/२०२२ रोजीच्या आदेशाने सदर खटला सत्र न्यायालय, सांगली कडे वर्ग केला.

५. आरोपी न्यायालयात हजर झाल्यानंतर त्याच्या विरुद्ध भारतीय

दंड विधानाच्या ३७६ व ५०६ या कलमांनुसार निशाणी क्रमांक १३ वर आरोप निश्चित करण्यात आले. आरोपीने त्याचेवरील आरोप नाकारून संपरीक्षेची मागणी केली.

६. सरकार पक्षाच्या वतीने वरील तक्त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे साक्षीदारांचा तोंडी पुरावा सादर केला व नमूद कागदपत्रांवर भिस्त ठेवून निशाणी क्रमांक २९ वरील पुरसिसनुसार पुरावा संपविण्यात आला. त्यानंतर आरोपीचा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आला. आरोपीच्या वतीने तोंडी पुरावा देण्यात आला नाही.

७. दोन्ही बाजूंचे युक्तीवाद ऐकले.

८. खालील मुद्दे विचाराधीन घेण्यात आले असून त्याखाली दिलेल्या कारणांच्या आधारे त्यापुढे निष्कर्ष नोंदविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | दिनांक ११/०८/२०२२ रोजी दुपारी ४.०० वाजता कडेगांवकर लॉज, कडेगांव येथे आरोपीने | नाही |

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| | फिर्यादी/पिडीतेसोबत जबरदस्तीने शारिरीक संबंध ठेवल्याचे सरकार पक्षाने शाबीत केले आहे काय ? | |
| २) | आरोपीने वरील कालावधीत फिर्यादीस फौजदारी पात्र धाकदपटशा दाखवून भारतीय दंड संहितेच्या कलम ५०६ अन्वये गुन्हा केल्याचे सरकार पक्षाने शाबीत केले आहे काय ? | नाही |
| ३) | कोणता आदेश? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्रमांक १ ते ३ बाबत :** – पुराव्याच्या सुलभ विश्लेषणाकरिता वरील मुद्दे एकत्रितपणे चर्चिले आहेत.

९. फिर्यादी/पिडीता हिच्या जबाबानुसार तिचे सन २०१२ साली लग्न झाले असून सन २०१९ पासून ती तिच्या गावामध्ये किराणा मालाचे दुकान चालवते. आरोपी हा तिचा सख्खा चुलत दीर असून त्याचे घर तिच्या घरासमोर आहे. तो तिच्या पतीस किराणा मालाची रक्कम देणे लागत होता व त्या कारणावरून त्या दोघांमध्ये मे २०२२ मध्ये वाद झाला होता. आरोपी तिच्यासोबत पहिल्यापासून व्यवस्थित वागत होता व त्याने तिला कोणताही

त्रास दिला नाही असे तिने तिच्या जबाब मध्ये नमूद केले. सरकारी वकिलांनी न्यायालयाच्या परवानगीने तिचा उलट तपास घेतला. तथापि, आरोपी तिला ती त्याला आवडते अशा प्रकारचे मेसेजेस, तिला त्याच्याशी मैत्री करण्याबाबत सांगत होता व तिने त्याचे ऐकले नाही तर ते मेसेजेस तिच्या नवऱ्याला दाखवण्याची तो धमकी देत होता तसेच तिच्याकडे शारीरिक संबंधाची मागणी करत होता या बाबी तिने उलट तपासामध्ये नाकारल्या. तसेच त्याने सदर मेसेजेस तिच्या नवऱ्याला दाखवण्याची धमकी देऊन तिला दिनांक ११/०८/२०२२ रोजी ती दवाखान्यात जात असताना तिला चार चाकी गाडीतून कडेगांवकर लॉज येथे नेऊन तिच्याशी तिच्या इच्छेविरुध्द शारीरिक संबंध ठेवल्याचे तिने नाकारले. तसेच फिर्याद मधील मजकूर देखील तिने नाकारला. अशा रीतीने सरकार पक्षातर्फे घेण्यात आलेल्या फिर्यादीच्या उलट तपासातून सरकार पक्षास सहाय्यभूत होईल अशा कोणत्याच बाबी अभिलेखावर आल्या नाहीत. तसेच आरोपी तर्फे घेण्यात आलेल्या उलट तपासामध्ये तिचे आरोपी सोबत कधीही शारीरिक संबंध झाले नसल्याचे तिने मान्य केले. तसेच आरोपी आणि त्यांच्यामध्ये किराणामालाच्या पैशावरून वाद

असल्यामुळे ती पोलीस ठाण्यात त्याच्याविरुद्ध फिर्याद देण्यास गेली होती हे देखील तिने उलट तपासामध्ये मान्य केले.

१०. फिर्यादीचे पती (स.सा.क्र.२) याने त्याच्या जबाबामध्ये फिर्यादी आणि आरोपी यांच्यामध्ये प्रेम संबंध असल्याचे त्याला गेल्यावर्षी गावातील लोकांकडून समजल्यामुळे त्याने फिर्यादीस तिच्या माहेरी पाठवल्याचे नमूद केले. तसेच आरोपीने तिला शिवीगाळ व धमकी दिल्यामुळे तिने पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केल्याचे त्याने नमूद केले. सरकार पक्षाने न्यायालयाच्या परवानगीने याही साक्षीदाराचा उलट तपास घेतला पण त्यातून काही निष्पन्न झाले नाही.

११. तपासी अंमलदार पवार (स.सा.क्र. ४) यांनी आरोपी आणि फिर्यादी यांचे मोबाईल फोन तसेच कडेगावकर लॉजवरील नोंदवही आणि आरोपी आणि फिर्यादीचे कपडे जप्त केले नसल्याचे त्यांच्या उलट तपासामध्ये नमूद केले. तपासी अंमलदार यांनी तपासा दरम्यान दाखवलेला वरील

हलगर्जीपणा हा निश्चितच सरकार पक्षाच्या विरोधात जाणारी बाब आहे. आरोपीच्या वतीने घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र.२२) अल्टो कार जप्ती चा पंचनामा (निशाणी क्र. २५) मान्य करण्यात आला तसेच तत्कालीन पोलीस ठाणे अंमलदार शिंदे (स.सा.क्र. ३) यांनी दिनांक ०७/०९/२०२२ रोजी पोलीस ठाण्यात फिर्याद (निशाणी क्र. पी–१/स.सा.क्र.३) दाखल करुन घेतल्याचे जबाबामध्ये नमूद केले. तथापि मुख्य साक्षीदार फिर्यादी हिनेच आरोपीने तिच्यावर कोणतीही शारीरिक जबरदस्ती केल्याचे किंवा धमकी दिल्याचे नाकारलेले असल्यामुळे सदर कागदोपत्री पुराव्याचा सरकार पक्षास फायदा होऊ शकत नाही.

१२. अशा रीतीने आरोपी विरुद्ध भारतीय दंड विधान कलम ३७६ प्रमाणे गुन्हा शाबित होत नाही. तसेच, आरोपीने फिर्यादीस कोणत्याही प्रकारे धमकी दिल्याचे फिर्यादीचे कथन नाही. अशा रीतीने आरोपी वरील दोन्ही आरोप शाबीत होत नसल्यामुळे मुद्दे क्रमांक १ व २ यांचे निष्कर्ष नकारार्थी देण्यात येतात.

**<u>मुद्दा क्रमांक ३ बाबतः</u>–**

१३. मुद्दे क्रमांक १ व २ यांचे नकारार्थी निष्कर्ष पाहता आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधान कलम ३७६ व ५०६ प्रमाणे आरोप शाबीत होत नसल्यामुळे सदर गुन्ह्यांतून आरोपी निर्दोष मुक्ततेस पात्र ठरतो. परिणामी मुद्दा क्रमांक ३ च्या निष्कर्षाप्रती खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी पंकज तानाजी पाटील याची भारतीय दंड संहिता कलम ३७६ व ५०६ या शिक्षापात्र गुन्ह्यांतून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २३५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचा जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३. मुद्देमाल मारुती अल्टो कार तिच्या मालकाच्या ताब्यात सुपूर्दनाम्यावर परत केली असून सदर कामी घेण्यात आलेला सुपूर्दनामा रद्द करण्यात येऊन सदर कारवर तिच्या मालकाचा ताबा अपिल कालावधीनंतर कायम करण्यात येत आहे.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३६५ प्रमाणे सदर न्यायनिर्णयाची प्रत जिल्हा दंडाधिकारी, सांगली यांना पाठविणेत यावी.

५. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४३७(अ) अन्वये रक्कम रुपये १५,०००/- चा जातमुचलका व तेवढ्याच रकमेच्या लायक जामीनबंधपत्र सादर करावा.

(खुल्या न्यायालयात अधिघोषीत केला).

सही/-

(मीना एम. पाटील)

दिनांक- २८/१२/२०२३ अतिरिक्त सत्र न्यायाधीश सांगली.

(Uploaded without digital signature as it is expired)

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | Shri. B.M. Patil (Steno Grade-I) |
| Court Name | : | Ad hoc Dist. Judge – 3 & Addl. Sessions Judge, Sangli. |
| Date of Order | : | 28/12/2023 |
| Signed by P.O. on | : | 09/01/2024 |
| Uploaded on | : | 09/01/2024 |